# महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई

**ऑफीस नं-८,२३, गोवा स्ट्रीट, बॅलार्ड ईस्टेट, फोर्ट, मुंबई -४०० ००१**
**दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०**
**ई-मेल आयडी -mpmcmumbai२०१७@gmail.com**
**वेबसाईट -www.maharashtraparamedicalcouncil.org**

---

जा.क्र.मपवैप/परिपत्रक-२०२२(१)/१६६/२०२२ दिनांक १६/०६/२०२२

## परिपत्रक

महाराष्ट्र परावैद्यक परिषदेच्या दि. १४ जून २०१९ च्या अधिनियमातील क्र. ५६ ते ५८ नुसार प्रमाणपत्र पडताळणी नंतरच्या नोंदणी प्रक्रियेसाठी अर्ज भरण्याची तरतूद केली आहे. त्याप्रमाणे नोंदणीसाठी नोंदणी शुल्का सोबत भरण्यात येणारे नोंदणी अर्ज अधिनियमातील नमुना क्र. ७ नुसार असून व ऑनलाईन भरल्यानंतर परिषदेस अर्ज सादर करण्यात येत आहेत. पुढील माहिती परिषदेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. (https://maharashtraparamedicalcouncil.org/Files/MPC_UserManual.pdf)

महाराष्ट्र परावैद्यक परिषदे मध्ये दिनांक १२/०५/२०२२ च्या बैठकीच्या ठराव क्रं.०१/२०२२ प्रमाणे महाराष्ट्र परावैद्यक परिषदे मध्ये Verification of Certificate साठी प्राप्त झालेले अर्ज पडताळणी झाल्यानंतर संबधीत अर्जदारास नोंदणीसाठी अर्ज करण्याचे ई-मेलद्वारे कळविण्यात येते. **अर्जदाराने ई-मेल प्राप्त झाल्यापासुन ४५ दिवसाच्या कालावधी मध्ये मुळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी परिषदेचा कार्यालयास ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या छापील प्रत (Permanent Registration Form), पाच हजार रुपये नोंदणी फी पावती, तीन अलिकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, अर्जामध्ये उल्लेख केलेले सर्व मुळ कागदपत्रे घेऊन स्वत: परिषदेच्या कार्यालयात उपस्थित राहावे. अर्जदाराने स्वत: मुळ कागदपत्रे घेऊन उपस्थित न राहिल्यास संबधित अर्जदाराचा अर्ज स्विकारला जाणार नाही.**

**तसेच दिनांक १६/०६/२०२२ पासुन मुळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी संबधित अर्जदार ४५ दिवसामध्ये परिषदेच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्यास त्या अर्जदाराचा अर्ज पुन्हा विचारात घेतला जाणार नाही. त्याच बरोबर संबधीत अर्जदारास प्रमाणपत्र पडताळणी (Verification of certificate) व नोंदणी प्रकीया नविन शुल्का सह पुन्हा करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी.**

Sd/-
**प्रबंधक**
**महाराष्ट्र परावैद्यक परिषद**